# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... | २६-३७ |
| आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीला | १२-१३ |
| स्फुट विषय ... ... ... ... | १५-१६ |
| श्री साईसच्चरित ... ... ... | ६९-९२ |


या श्री साईलीला मासिकांतून येणाऱ्या विषयांची पुढें मागें विषयवार स्वतंत्र पुस्तकें बांधली जाणाऱ्याच्या सोयीसाठीं पूर्वोक्त तीन अंकांत आलेले विषय धरून या पुढें विषयवार पृष्ठांक घातले जाण्याची तजवीज ठेविली जाईल.

श्री साईलीलेचा यापूर्वी ज्येष्ठ महिन्याचा म्हणून प्रसिद्ध झालेला अंक अधिक ज्येष्ठाचा असें समजण्यांत यावें.

# श्रीसाई लीला.

## (मासिक)

वर्ष १ लें. * ज्येष्ठ शके १८४५. अंक ४ रा.

## महाराजांचे अनुभव.

रा. रा. वामन चिंतामण मुके-वकील पिंपळगांवबसवंत जिल्हा नाशिक यांचे श्री साईबाबांबद्दलचे अनुभवांबद्दल ता० ११।७।१९२१ चें पंचवटीहून आलेल्या पत्रांतील कांहीं अनुभवांचा उतारा:—

" माझे मोक्ष गुरू श्रीसमर्थ रघुनाथमहाराज उर्फ काका पुराणिक धोपेश्वर ( राजापूर जि॥ रत्नागिरी ) यांचा मला उपदेश झाल्यावर समर्थांचे कृपेनें माझें मन परमेश्वर भक्तीकडे वळलें. दिवसाचा थोडा काळ मी गुरूभक्तींत घालवूं लागलों. माझे गुरूचे कृपेनें मला ज्ञानेश्वरी ऐकावी अशी इच्छा झाली. एका ज्ञानेश्वर भक्ताची भेट गुरूनीं करून दिली. ज्ञानेश्वर महाराजांनीं आपले गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांचे बद्दल आपलें निस्सीम प्रेम ज्ञानेश्वरींत वारंवार व्यक्त केलें आहे. याची ज्ञानेश्वरीचे भक्तांस माहिती आहे. गीतेच्या १३वे अध्यायांत "आचार्योपासना" या विषयावर ज्ञानेश्वरमहाराज यांनीं गुरूकृपेशिवाय ज्ञानप्राप्ति नाहीं असें सांगितलें आहे. माझे सद्गुरू समाधिस्थ झाल्यामुळें मला गुरूभक्ती घडली नाहीं ही गोष्ट माझें मनास डांचूं लागली. इतक्यांत माझें सद्गुरू काकामहाराज यांनीं मला शिरडीस जाऊन श्रीसमर्थ साईबाबांचें दर्शन घेण्याची प्रेरणा केली. समर्थांचे प्रेरणेप्रमाणें मी शिरडीस गेलों. साईबाबांनीं मला त्यांचे दर्शन होतांच माझें मन गुरूभक्तींत तल्लीन केलें. बाबांनीं माझे प्रेम पाहून व मजवर प्रसन्न होऊन मी घेतलेल्या त्यांच्या सगुणोपासनेच्या बुकाला व त्यांचे फोटोला हस्तस्पर्श केला.

* मागील अंक अधीक ज्येष्ठाचा समजावा.

मी पिंपळगांव बसवंत तालुके निफाड येथील रहाणार असून त्यागांवीं मी वकिलीचा धंदा करितों. सुमारें सहा वर्षांपूर्वी आमचेगांवीं प्लेग झाल्यामुळें मी आमचे गांवचे माझे मालकीचे शेतांत प्लेगचे वेळीं राहण्यासाठीं एक लहान बंगला बांधला आहे. त्या बंगल्यांत आमचे कुटुंबांतील सर्व मंडळीसह रहात होतों. बंगल्यांत रहात असतां माझा नित्यक्रम साईची सकाळीं व संध्याकाळीं प्रार्थना करण्याचा असे. एके दिवशीं मध्यरात्र झाल्यावर चोरांनीं माझे बंगल्याचे उत्तरबाजूची भित फोडली. ज्या ठिकाणीं भित फोडली त्या ठिकाणापासून समर्थांचा फोटो एक वितीचे अंतरावर ठेविला होता. चार चोरांपैकीं एक चोर फोडलेल्या भितीचे भोकांतून आंत शिरला व त्यानें ज्या पलंगावर मी निजलों होतों त्या खालीं ठेविलेली लहान पेटी लांबविली व ती भोकाचे वाटे भोकाजवळ उभे राहिलेल्या साथीदारांचे स्वाधीन केली. त्या पेटींत दोनशें रुपयांच्या नोटा व रुपया एक व कांहीं आणे होते व माझे रिणकोकडून लिहून घेतलेल्या सुमारें चार हजार रुपये पर्यंतच्या×(वचनचिठ्या) होत्या. ही पेटी बाहेर दिल्यावर आंत आलेल्या चोरानें साईबाबांचे फोटोचे समोर एक ट्रंक एका बाकावर ठेविली होती. त्या ट्रंकमध्यें सोन्यांचे दागिने किंमत सुमारें रुपये २५०० व चांदीचीं भांडीं किंमत सुमारें ५०० रुपये व दस्तऐवज किंमत सुमारें रुपये १०००० चे होते. चोरानें ट्रंकला हात घातल्याबरोबर ट्रंकच्या शेजारीं आमची मेहुणी निजली होती ती जागी होऊन " चोर चोर " म्हणून भीतीनें ओरडली. तिचा ध्वनी मी गाढ झोपेत असल्यामुळें मला ऐकूं आला नाहीं. इतक्यांत बाबा माझे स्वप्नांत येऊन " तुझी ट्रंक गेली जागा हो " असें मला सांगितलें. मी एकदम उचकून जागा झालों व बाबांचे प्रेरणेनें पलंगावरून गडबडीनें उडी मारून हातांत काठी घेऊन मोठ्या आवेशानें " मारो इसकू " असा ध्वनी केल्याबरोबर चोर भोकावाटे बाहेर पळून गेला. या गडबडीनें बंगल्याचे रक्षणासाठीं ठेविलेला जागल्या व कुत्रा, कारकून व गडी जागे झाले व त्यांनीं मोठी ओरडा आरड केल्यामुळें सर्व चोर पळून गेले. मला एकदम गीतेंतील

×खानगी नोट्स्.

अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनाः पर्युपासते ॥
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

या श्लोकाची आठवण झाली व समर्थांचा उतराई होऊन त्यांस साष्टांग-नमस्कार घातला. इतका वेळ पर्यंत आम्हांस पेटी गेल्याची माहिती झाली नाहीं. माझे मनुष्यास पाठवून पोलिसस्टेशन अमलदार यांस आमचे बंगल्यावर घर फोडीचे चोरीचा प्रयत्न झाल्याची खबर दिली. पोलीस आल्यावर ते लेखी फिर्याद मागूं लागले. लेखी फिर्याद लिहिण्यासाठीं पेटी पाहूं लागलों तों पेटी चोरांनीं नेली असें कळलें तथापि या नुकसानी बद्दल माझे मनास यत्किंचितही धक्का पोंचला नाहीं. पोलीस लेखी फिर्याद लिहून घेऊन गेल्यावर सूर्योदय झाला. इतक्यांत आमचे मळ्याचा शेतकरी आमचे बंगल्यापासून एक फरलांगाचे अंतरावर वर लिहिलेला चोरीचा माल पेटी शेतांत पडलेली आहे असें सांगत आला मी लगेच त्याठिकाणीं जाऊन पेटी पाहिली. पेटींत असलेल्या जिनसांपैकीं रुपये २०० च्या नोटा व कांहीं खुर्दा व एक रुपया रोख याशिवाय एकही जिन्नस चोरांनीं हलविली नाहीं. पेटी आपोआप उघडल्यामुळें पेटी तशी-च्यातशीच न फुटतां मिळाली.

दुसरे दिवशीं पहाटेस दुसरा चमत्कार घडला, तो असा की मला स्वप्न पडून स्वप्नांत मला बाबांनीं दर्शन दिलें. स्वप्नांत मी बाबांचे पायांची सेवा करीत आहें. त्यांचे शेजारीं त्यांचा सच्छिष्य अबदुल हा त्यांचे जवळ आहे व दुसरा ज्यांस मी पूर्वी कधींही माझे सर्व आयुष्यांत पाहिला नव्हता असा गौरवर्णाचा तेजस्वी फकीर दृष्टीस पडला. या स्वप्ना-मुळें मला शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. मी शिर्डीस त्याच दिवशीं संध्याकाळचे आगगाडीनें जाण्यास निघालों तो दुसरे दिवशीं शिर्डीस जाऊन पोंचलों. इतक्यांत समर्थांची स्वारी गांवा-बाहेर शौचविधिसाठीं येतांना दृष्टीस पडतांच मी रस्त्यांतच त्यांस साष्टांग नमस्कार केला. बाबांनीं प्रेमळ अंतःकरणानें मला व माझे बरोबर असलेल्या मंडळीस गांवांत जाण्यास सांगितलें. गांवांत जाऊन बाबांचे

अत्यंत प्रेमांतील भक्त रा. हरि सिताराम दीक्षित यांचे बंगल्यावर बिऱ्हाड ठेविलें. कांहीं वेळानें बाबांचें दर्शनासाठीं मशिदींत गेलों तेव्हां दर्शनाचे प्रसंगीं ज्या गौरवर्णाचे तेजस्वी फकीरास मी स्वप्नांत पाहिलें होतें तोच फकीर माझे दृष्टीस पडला. त्याचे बद्दलचा तपास करितां तो फकीर बाबांचा शिष्य अबदूल याचा पूर्वीचा गुरू आहे असें समजलें. पिंपळगांवीं स्वप्नांत एक दिवस पूर्वी ज्या फकिरास मी बाबांचे शेजारीं पाहिलें तो फकिर त्याच स्थितींत मी जागृतावस्थेंत पाहिला हा केवढा चमत्कार !

तिसरा चमत्कार-यानंतर कांहीं दिवसांनीं पिंपळगांव येथें आम्ही आमचे बंगल्यावर रहात असतां कोपरगांव येथील ब्रम्हचारी बुवा माझें स्मरण करून माझे बंगल्यावर राहण्यास आले. आम्ही तीन दिवस मोठ्या प्रेमानें बाबांचें भजनपूजन केलें. ब्रह्मचारीबुवांनीं जातांना मला बाबांच्या कृपेनें तुझ्या चोरीस गेलेल्या नोटा सांपडतील असें सांगून गेले. पुढें कांहीं महिन्यांनीं आमचे बंगल्यावर ज्या चोरांनीं घर फोडून चोरी केली होती ते व चोरीचा माल विकत घेणारा एक मारवाडी हे सर्व दुसरे एका चोरींत पकडले गेले. चोरीचा माल विकत घेणारे मारवाड्याचे घरांत आमचे घरचे चोरींतील कांहीं नोटा सांपडल्या. त्या नोटा-आमचे घरचे चोरींतील आहेत असें त्या चारी चोरांनीं कबूल केल्यामुळें आमचे घरची चोरी चोरांचे कबूलीवरून आपोआप शाबीत होऊन रुपये दोनशेंच्या नोटांपैकीं पांसष्ट रुपयांच्या नोटा आमच्या ठरून त्या पोलिसांनीं आमचे घरीं पिंपळगांवीं आणून मला दिल्या.

साईदास.
वामन चिंतामण मुक्के वकील.
पिंपळगाव बसवंत जिल्हा नाशिक

---

महाराजांचे एक पुरातन भक्त म्हाळसापती या नांवाचे होते ते नुकतेच कैलासवासी झाले. महाराज एक रात्र मशिदींत निजत व एक रात्र चावडींत निजत असा नित्यक्रम असे. ज्या रात्रीं महाराज मशिदींत

निजत त्या रात्रीं म्हाळसापती महाराजांचें जवळ रात्रभर बसून असत. व रात्रभरांत कधींही आडवे होत नसत. म्हाळसापतीची सांपत्तिक स्थिति अति निकृष्ट असे. इतकें असूनही त्यांचें नैराश्य अवर्णनीय होतें. महाराजांचे कडून त्यांचें नैराश्य स्थितीचे उत्तेजनपर असेंच वर्तन असे. एकदा म्हणजे इ. स. १९१७ मध्यें त्यांची गरीबी मनांत आणून हंसराज नामक दादरास राहाणाऱ्या एका व्यापाऱ्यानें त्यांना दहा रुपये देऊं केले; ते त्यांनीं घेतले नाहींत. हंसराज शेटजीनीं मग ती रक्कम रा. रा. बापुसाहेब जोग यांचे मार्फत म्हाळसापतीकडे पाठविली तरीही त्यांनीं ती घेतली नाहीं मग ती रक्कम रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांजकडे आणिली आणि महाराजांचे समोर म्हाळसापतीस द्यावी असें सुचविलें. त्याप्रमाणें म्हाळसापती महाराजांची पूजा करीत असतां रा. रा. दीक्षित हे ती रक्कम त्यांना देऊं लागले ते ती घेईनात. दीक्षित महाराजांना म्हणाले "आपण त्यांना घेण्यास सांगा किंवा आपण घेऊन त्यांना द्या." महाराज म्हणाले "सध्यां तुझ्याजवळ राहूं दे !" म्हाळसापती पूजा आटोपून निघून गेल्यावर कांहीं वेळानें महाराजांनीं दीक्षितांस विचारलें "किती रुपये आहेत?" ते म्हणाले "दहा." महाराजांनीं ते रुपये आपल्या गादीवर ठेवण्यास सांगितले व नानासाहेब निमोणकरांचे हातानें ती रक्कम इतर लोकांना वाटवून दिली. अर्थातच त्या रकमेपैकीं कांहींही भाग म्हाळसापतीकडे गेला नाहीं

–रा. रा. चिदंबर केशव गाडगीळ या नांवाचे महाराजांचे एक भक्त होते. ते सरकारी नोकरीवर होते. कांहीं दिवस नगरास कलेक्टरचे चिटणीस होते. पुढें सिन्नरास मामलेदार होते. त्यांना वेळोवेळीं दर्शनाचा लाभ घडत असे. सिन्नराहून त्यांची बदली कोठें लांब झाली व तावडतोब जाऊन रुजू होण्याचा हुकूम मिळाला. महाराजांचे दर्शनास जाण्याला अवकाश राहिला नाहीं. ते कोपरगांवाकडूनच आगगाडीनें गेले पण दर्शनास जातां येत नाहीं, याबद्दल त्यांना फार हुरहूर लागली. पुढें गाडी चालली असतां एकाएकीं खिडकी वाटे एक कागदाची पुडी त्यांचे अंगा-

वर येऊन पडली उघडून पहातात तों त्यांत उदी सारखी पूड दिसली. त्यांनीं ती जतन करून ठेवली. पुन्हां दर्शनास जाण्याचा योग आला तेव्हां महाराज आपण होऊन त्यांना म्हणाले " तूं आला नाहींस म्हणून मी तुला उदी पाठविली ती पोहचलीना ? " गाडगीळांना हें शब्द ऐकून गहिंवर आला. पुढें ती उदी त्यांनीं एका ताइतांत घालून ठेवली व ती शेवटपर्यंत त्यांचेजवळ होती.

रा. रा. लक्ष्मण कृष्ण उर्फ तात्यासाहेब नूलकर हें महाराजांचे भक्त होते ते पंढरपुरास मुन्सफ होते. तेथें त्यांच्या डोळ्याला कांहीं विकार झाला. कोणतीही वस्तु पाहिली कीं, तिच्यावर दुसरी तशीच वस्तु दिसावयाची. अक्षरेंही अशींच दुहेरी दिसावयाचीं. मग त्यांनीं रजा घेतली व बंधू जळगांवास डाक्टरी करीत होते तेथें गेले. तेथें गेल्यानंतर दोनचार दिवसांनींच गुरुपौर्णिमा होती. पौर्णिमेच्या आदले दिवशीं भावाच्या विचारानें तात्यासाहेब पौर्णिमेसाठीं शिर्डीस आले दोन दिवस राहून परत जाण्याच्या बेतानें ते आले होते म्हणून कपडे सामान औषधें, वगैरे कांहीं बरोबर आणलें नव्हतें. आले त्या दिवशीं बहुतेक दिवसभर डोळे बांधूनच पडले होते दुसरे दिवशीं महाराज माधवरावांना ह्मणाले "शामा माझा आज डोळा फार दुखत आहे." तेव्हांपासूनच रा. तात्या साहेबांचें डोळे हळु हळु सुधरूं लागले; व कांहीं दिवसांनीं औषध घेतल्याशिवाय साफ बरे झाले.

---

तात्यासाहेब नूलकरांना शिर्डीस थोडे दिवस राहिल्यावर असें वाटं लागलें कीं, आतां येथेंच राहावें व आपला शेवट महाराजांचे पायांपाशींच व्हावा व अखेरीस झालेंही तसेंच. त्यांना मधुमेहाचा विकार पुष्कळ वर्षे होताच, त्यांची एक दोन गळवें झालीं व तीं कापलीं. पुढें आणखी पुष्कळ गळवें आलीं. व त्या दुखण्यांतच त्यांचा अंत झाला. तो सुमारें रात्रीं दोन वाजतां झाला. त्याच्या एक तास अगोदर त्यांनीं आपल्या

दोघांही मुलांना भजन करावयास सांगितलें. मग " आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे ॥ जो मी तुज पाहें नारायणा ॥ " हा अभंग म्हणावयास सांगितला, नंतर एका मुलानें तोंड आकरावयास सांगून त्यांत उदी घातली व दुसऱ्या मुलानें महाराजांचें तीर्थ घातलें. तात्यासाहेबांनीं विचारलें " हें काय आहे ? " मुलांनीं म्हटलें " उदी व तीर्थ आहे " एवढें झाल्याबरोबर एकदम प्राणोत्क्रमण झालें. जवळ कुटुंबांतील सर्व माणसें होतीं पण तात्यासाहेबांचे चेहऱ्यावर यत्किंचितहि खिन्नता नव्हती.

---

वांद्याचे एक गृहस्थ सन १९१० मध्यें आपल्या एका मित्राबरोबर शिर्डीस गेले होते. त्या मित्रानेंच त्यांचें येता जाताचें भाडें दिलें. त्या गृहस्थानें आपल्याबरोबर तीन कोरे रुपये नेले होते पण महाराजांना कांहीं दक्षिणा द्यावयाची नाहीं, असा त्यांचा संकल्प होता. महाराजांनीं त्यांच्या जवळ मुळींच दक्षिणा मागितली नाहीं. परत येतांना ते गृहस्थ आपल्या स्नेह्याला सांगूं लागले " मी शिर्डीस तीन कोरे रुपये घेऊन गेलों होतों ते मी तसेंच परत घेऊन जात आहें. " वांद्यास पोहचण्याचे आदले रात्रीं त्या गृहस्थाचे कुटुंबास स्वप्न पडलें कीं, आपल्या नवऱ्याची पैशाची पिशवी व एक भरलेली आगडबी ( आगपेटी ) व एक रिकामी आगडबी शेतखान्यांत पडली आहे आणि पैशाचे पिशवींत तीन कोरे रुपये आहेत. स्वप्न इतकें स्पष्ट पडलें कीं, बाई जागी झाल्याबरोबर शेतखान्यांत जाऊन खरोखरच रुपये पडले आहेत कीं काय ? हें पाहूं लागली. अर्थांत रुपये तेथें नव्हते पण ते गृहस्थ परत आल्यावर त्यांनीं हें स्वप्न सांगितलें व ते आपल्या खिशांत पाहूं लागले तों त्या खिशांत दोन आगडब्या एक भरलेली व एक रिकामी; व पैशाची पिशवी व तींत तीन कोरे रुपये एवढें सामान दिसलें. अर्थातच त्या स्वप्नापासून बोध घ्यावयाचा तो त्यांनीं घेतला व त्यांनां उपरती होऊन त्यांनीं ते तीन कोरे रुपये व दर रुपया मागें चार आणे दंड असे पावणेचार रुपये महाराजांस दक्षिणा म्हणून पाठविले. पुढें ते गृहस्थ सहकुटुंब व माता पितरांना घेऊन एक महिना शिर्डीस जाऊन राहिले होते.

---

एकदां एक योगाभ्यासी गृहस्थ आपल्या कांहीं शंका विचारण्यासाठीं नानासाहेब चांदोरकरांचे बरोबर महाराजांकडे गेले होते. त्यावेळीं महाराज जेवावयास बसले होते. जेवण म्हणजे भाकर व कांदा. महाराजांचे हातांत कांदा पाहिल्याबरोबर त्या गृहस्थाचे मनांत विकल्प उत्पन्न झाला. तो मनांत म्हणूं लागला हे कांदा खातात तर हे कसले योगी व आपल्याला यांचेपासून काय मदत मिळणार ? हें त्यांचे मनांत आल्याबरोबर महाराज म्हणाले " नाना ! कांदा खाऊन पचविण्याची ज्याची शक्ति असेल त्यानें तो खुशाल खावा. " हें महाराजांचे अंतर्साक्षित्व पाहून तो गृहस्थ मनांत चरकला व मनांतले मनांत शरण गेला, मग महाराजांनीं त्याच्या सर्व शंकाचें समाधान केलें व तो प्रसन्न होऊन गेला.

---

### रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल. बी. ए. एल्. एल्. बी. यांचे श्रीसाईबाबाबद्दल अनुभव.

॥ ॐ साईनाथायनमः ॥

पूज्य प्रिय—

म्हारां स्मरणो आशरे दश वर्षनां जुनां छे पण हजी ताजांज छे.

माथे मादरपाटी ककडी वींटाळेली ने शरीरपर पण एज स्वदेशी वस्त्रनी कफनीवाळी म्हारी आकृति म्हारी कृपाथी; स्मरणमात्र थी खडी थाय छे-थया करे छे ने म्हारां अणुरेणु पिंडब्रह्मांड सर्व स्थळे व्यापी रहेलां स्वरुपनी याद आपे छे. ते म्हारां स्वरुममां म्हने कायममाटे लीन थइ जवादे ए प्रार्थना.

ज्यारे पाश्चात्यन्याय अने तत्वज्ञानना प्रभावे इश्वरना अस्तित्व ने स्वरुप विषे संशय वा जिज्ञासा उत्पन्न थयेली हती, ज्यारे जगत्नुं बंधारण न्यायपर रचायुं छे, के आकस्मिकज छे, ए प्रश्न म्हारी समक्ष उभो रहेलो हतो, त्यारे म्हारा स्व. पिताना कहेवाथी हुं म्हारे दर्शने प्रथम आव्यो. त्यारबाद कोटलीकवार आव्यो गयो. एक वखत म्हारी इच्छा थी हुं अगीआर महिना शिर्डी रह्यो. त्यारपछी एक वर्ष जेवा टुंक समयमां तें उपरना

केटलाक प्रश्नोनुं वेदोपनिषदानुसार निराकरण कर्युं ने बाकीना बधा प्रश्नोनुं संपूर्ण तेवीज रीते निराकरण ऑक्टोबर १९१६ मां करी आप्युं.

आर्टीकल्ड क्लार्कनी परिक्षामां बेसवामाटे कंई पण लांबा वखतनी गेरहाजरी शिवाय सॉलीसटरने त्यां एल. एल. बी. ओने बे वर्षनी टर्म राखवानी होय छे. तेर महिना भर्या बाद ज्यारे गरमीनी रजामां हुं त्हारी पासे आव्यो त्यारे म्हें म्हने लागलागट अगीआर महिना राख्यो. शिर्डीथी पाछां फर्या बाद केटलोक समय बीत्यांपछी पाछो टर्म राखवानो म्हारो विचार थवाथी त्हारी संमति ते माटे लई जूनी पेढीना सॉलीसीटरोने मळ्यो. त्यांना मुख्य सॉलीसीटर रा. ज. ज. बीमादलाले कह्यु "हवे तमोने राखी शकाय नहीं राखीए तोये फरी तमारे टर्म भरवी पडशे एटलेके फरी बे वर्ष भरवां जोयशे. पण जो तमो कोर्टनी परवानगी बाकीना महिनाभरी टर्म पूरी करवा माटे मेळवो तो म्हने कंइ वांधो नथी छतां हुं तो धारुंछुंके कोर्ट जो एम करवा रजा आपशे तो ते तम्हारे माटे नवोज कायदो घडशे. आटला दिवसमां कदी एवो केस बन्यो नथी." आ उपरथी वडा न्यायाधीशने ए बाबतमां अरजी करी ने त्हारी कृपाथी तेमणे बाकीनी ११ महिनानी टर्म भरवाथी राखवो जोयती टर्म भरेली गणाशे एवो चुकादो आप्यो.

अतिशय क्षुधाथी एक दिवस व्याकुळ थयेल होवाथी तुं उभो हतो ते रस्तेथी नहीं पण बीजेज रस्तेथी हुं वीशीमा जतो हतो~~, त्यारे म्हें भांडो~~ कहाडी त्हारी मेळेज कह्युंके "जायछे पण हेरान थशे" म्हारे माटे ते म्हें नहि कह्युं होय धारी म्हें वीशी मांजइ नास्तो कीधो. बीजे एक दिवसे पण क्षुधा लागवथी आवी रीते संताइनें जतो हतो त्यारे त्हें आवीज रीते आवेथी कहेलुं पण ते वखतनी क्षुधानी तीव्रताथी म्हें त्हारा कहेवानो अनादर कीधो हतो; बेऊ वखते बीजेज दीवसे पेटमां सखत दुखावो थइ केटलीकवार शौचे जवुं पडयुं हतुं. त्हारां वचननो अनादर करनारने पण त्हें कृपा देखाडीज हती. पहेलां वखते तो कलाकमांज सारुं थइ गयेलुं ने बीजीवार ज्यारे आखो दिवस हेरान होवाथी जरा हुं गभरायो हतो त्यार

र्हें रा. बापुसाहेब जोगने आपेलो मीठाई प्रसाद म्हने मळ्यो तेथी पेटम दुखतुं बंध थई गयुं ने प्रकृति स्वस्थ थई गई

अगीआर महिना रह्यो ते दरम्यान हुं केटलोक वखत हाथे रांधतो हतो पण पछी म्हने कंटाळो आववाथी म्हें एक दिवस स्हवारमांज कोइनें कह्यांशिवाय म्हारा मन साथे निश्चय करेलो के आजे कांई रांधवुंज नहीं पण फकत काचुं कोरुं खाई मुकवुं. ते दिवसें हुं त्हारी पासे एकलो हतो त्यारे तें फकत एटलुंज कह्युं के "बहु शोखीन थइ गयो" आ उपरथी म्हारो ठराव अयोग्य हतो एम म्हने जणायुं.

त्हारे माटे बपोरनी भिक्षा मांगवानुं त्हें म्हने मान आप्युं हतुं ते दरम्यान एक दिवस भिक्षा लेवा जतां हाथनी अनाभिका आंगळी दिवाल साथ घसाववाथी छोलाइ स्हेज लोही नीकळेलुं. हुं ज्यारे भिक्षा लेइ मस्जीदमां पाछ आव्यो त्यारे त्हें त्हारी अनामिका उंची करी म्हने देखडावी एम सूच युंके त्हारी आंगळीना दरदनी म्हने खबर छे.

त्हारा कहेवाथी हुं त्हारा एक भक्तने त्यां केटलोक वखत जमतो हतो. केटलाक दिवसबाद म्हने त्यां जमवुं पडतुं तें ठीक न होतुं लागतुं पण त्हें कहेलुं तेथी हुं त्यांज जम्यां करतो. आ वात म्हें कोइने कही नहोती. छतां एक दिवस त्हें त्हारी मेळेज हुं उभो हतो ने कह्युं "अडचण शुं काम भोगववी, वीशी वाळा साथे गोठवण करी ले."

एक वखत म्हारो विचार त्हारां दर्शन लेई, वारोवार मन्माडथई टाप्टीवॅली रेलवेमां बारडोली थइ मोता मारा स्व. पिता जे ते वखते मांदा हता तेमनी खबरलेवा खास जवानो हतो. शियाळानो दिवस होवा थी त्यां रात्र थाय ते प्हेलां पहोंचवाने तेमज म्हें बारडोली स्टेशने गाडी मगावेलो न होवाथी, बारडोली स्टेशनपर म्हारे स्हवारनी ट्रेनमांज उतरवानी जरुर हती. त्यां स्हवारे पहोंचाडे एवी ट्रेनमाटे म्हारी समजप्रमाणे म्हारे शिरडीथी बपोरेज नीकळवुं पडतुं हतुं तेथी लागलागट म्हें चेदीवस बपोरे त्हने जवा माटे पूछ्युं त्यारे त्हें जवा ना पाडी, आथी विस्मीत थइ धर्मशाळामां उतरेला एक गृहस्थपासेथी रेलवे गाईड लेइ गाडीओ

विषे स्हेज जोयुं तो समजायुं के स्हवारनी ट्रेनमां जवानी जरुर छे. ते प्रमाणे बीजे दीवसे जवा परवानगी मांगतां तें तरत आपेली.

१९११ मां ज्यारे हुं प्रथम त्हारे दर्शने आव्यो त्यारे म्हें त्हारी नानकडी छबीने लॉकेटमाटे बे छबी खरीदेली. बधा भक्तो जेम छबीओ त्हारा हाथमां आप्यां बाद घेर लई जता ~~तेमज म्हारी पण ईच्छा~~ ते त्हारा हाथमां आप्यां बादज घेर लई जवानी हती, पण ते शरमने लीधे बनी शक्युं न होतुं ते म्हारां मनमां म्हने लागतुं हतुं. छतां बहु दीवस थइ गयेला होवाथी म्हें शिरडीथी घेर पाछा फरवानो निश्चय कीधो ने त्हने पूछ्युं " घिराडी जाऊ काय ? " त्यारे त्हें " हा " कही खुशीथी उदी आपी ने कह्युं जा. तेथी गाडी करी हुं नीकळ्यो. गाडीवान एक छोकरोज हतो. कोपरगांव आवतां ते छोकरो कहे " अहीं जामफळ बहु सारां मळेछे ते थोडां घेर लेइ जाव; हुं उतरीने वाडीमांथी त्हमने लावी आपुं म्हें एने कह्युं " हवे शो उपयोग ? पण जो तुं हुं आपुं ते जामफळ लेइ जई " बाबा " ने पहोंचाडे तो लइ आव " एणे हा पाडी तेथी म्हें एने जामफळ लेवा मोकलयो ने ए गया बाद हुं गाडीमांथी लघुशंका माटे नीचे उतर्यो ते कार्यथी निवृत्त थइ छोकरानी वाट जोतो आम तेम गाडीपासे फरवा लाग्यो. फरवाथी बूटनो जे अवाज थयो तेथी गाडीना बळदो भडकी सामान साथे गाडी लेइ पाछा शिरडी तरफ दोडया. में ने बीजा एक जणे ते बळदोने ऊभा राखी पाछा फेरववा व्यर्थ प्रयत्न कर्यो पण ते फंइ झलाया नहीं. तेथी जे जग्याए बळदो नाठेला ते जग्या ए पाछो आवी हुं उभो. घणो वखत हुं थोभ्यो पण छोकरो पाछो आव्यो नहीं तेथी हुं कोपरगांव स्टेशन तरफ पगे चाल्यो. थोडे गयो एटले ते छोकरो पोलीसने लेइ आवतो मळयो. पोलीस ने बनेली बाबतनो खुलासो करी छोकरा साथे गाडीनी शोधमां हुं शिरडी तरफ पाछो फर्यो. तो सावळी वीर आगळ गाडी एमना एम रहेलां सामान साथे त्यांना चोकीदारे उभी कीधेली जोई. पछी शिर्डी पाछो फर्यो ने बे त्रण दिवस वधु रह्यो ते दरम्यान मुंबाईना एक जाणीता वकीलनी ओळखाण थइ ने तेमणे पोताने माटे त्हारी छबी लीधेली ते त्हारा हाथमां आपी. त्यारबाद तेनी साथे म्हें

पण जे छविओ.. अगाउ हुं ह्हारा हाथमां आपी शक्यो न हतो ते आप, पाछी लीधी ने पछी ह्हारी रजा लेइ पाछो फर्यो त्यारे रस्तामां कांइ विघ्न नडयुं नहीं.

एक स्हवारे पेटमां दूखतुं हतुं. आवखते स्हेजा कांइ थायके दवा खावानी म्हने टेव पडेली तेथी पेटमां दुखवा मांडयुं के तरतज पेनकील-रनी वाटलीनी घरमां शोध करी पण ते हतुं नहि तेथी दीलगीर थइ हुं बेठो हतो. एटलामां ह्हारी उदीनी बाटलीपर नजर गइतेमांथी थोडी उदी लेइ फाकी तो ते उदीनो स्वाद पेनकीलरना जेवोज लाग्यो ने पेटमां दुखतुं बंध थई गयुं. जे बाटलीमां म्हें भरेली ते तद्दन साफ कीधेली सॅनेटोजननी वाटली हती एटले एमां पेनकीलरनो स्वाद संभवेज कयांथी ?

१९१६ ना ऑक्टोबर मासमां ज्यारे हुं रात्रिए गमे त्यां जइ रस्ता-पर के निर्जन ज ामां सूइ रहेतो त्यारे मायाळु पितापेठे तुं म्हारी शोध माटे माणसो मोकलतो.

हे पूज्यप्रिय आवीरीते तुं खरेखर म्हारां मात, पिता, बंधु, मित्र, गुरु प्रसंगोपात बन्यो पिता तरीके ह्हें म्हने लाडनुं " बाबु " नाम पण केट-लोक वखत आप्युं पण आ बधा लाडना प्रतीकारमां जे काया वाचा मनथी म्हारी जातनुं अर्पण थवुं जोइए ते म्हाराथी बनी न शक्युं–म्हें ह्हारां लाडक बाबा नामने लजाव्युं तुंतो " अजन्मायमेकं परब्रह्म साक्षात" तेथी तने मायाना विशेषणो न शोभे–बन्धी तुं तो मा बाप गुरु मित्र बंधु वखतोवखत बन्यो त्यारे तुंने एक एवुं शुं नाम आपवुं ते न समजायाथी शरुआतमां ' पूज्य प्रिय ' कही संबोध्योछे आटली सलगी जे ह्हने कांइ-पण पूर्णपणे अर्पण करी शक्यो नथी तेने न घटे छतां ह्हारो हंमेशनो " स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयन्तं-" नो कृपाळु क्षमाशील स्वभाव याद आवतां आ धृष्टतां कीधी छे–तेने माटे क्षमा.

लेः-लाडका नामने अयोग्य पण लाडकु नाम राखवामां मात्र समजनार ह्हारो बाळ " बाबु " ना शिरसाष्टांग नमस्कार

# आतांपर्यन्त छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

महाराजांच्या उदी ( अंगारा ) संबंधानें हजारों लोकांना अनुभव आले आहेत. तेच नुसते एके ठिकाणीं गोळा केले तरी एक प्रचंड ग्रंथ होईल. तें काम महाराजांना कोणाकडून करवून घ्यावयाचें असेल, तर तें करवून घेतीलच; पण तूर्त या प्रस्तावनेंत त्यांपैकीं थोडेसे अनुभव केवळ दिग्दर्शनार्थ नमूद करीत आहें.

माझे एक पारशी स्नेही एके ठिकाणीं स्टेशनमस्तर होते. त्यांना एक विकार होता, व त्यासाठीं त्यांनीं मुंबईच्या चांगल्याचांगल्या डॉक्टरांचीं औषधें घेतलीं होतीं; पण विकार गेला नाहीं. एक दिवस त्यांनीं मजकडून महाराजांची उदी घेतली व तिचें तीन दिवस सेवन केलें. चवथे दिवशीं त्यांचा विकार साफ नाहींसा झाला.

एका पारशी गृहस्थाच्या तान्या मुलीला आंकडी येत असे. प्रत्येक तासातासाला तिला तें वारें येई, आणि ती अत्यवस्थ होत असे. त्या गृहस्थाला त्याच्या एका स्नेह्यानें मजकडे पाठविलें व मीं त्याला उदी दिली. ती तो घेऊन गेला आणि दुसऱ्या दिवशीं त्यानें मला येऊन सांगितलें, कीं, उदी दिल्यानंतर आंकडी दर तासाला न येतां सात तासांनीं आली व तिच्यापासून फारच कमी त्रास झाला. व तो आणखी उदी घेऊन गेला.

हर्द्याजवळ एका खेड्यांत एक म्हातारा गृहस्थ मुतखड्याच्या विकारानें अतिशय त्रस्त झाला होता. पुष्कळ लोकांनीं त्याला शस्त्रक्रिया करवून खडा काढवावा असें सांगितलें, पण त्याची हिंमत होईना. शेवटीं तो मरणोन्मुख झाला. तितक्यांत माझे एक गुरुबंधु जे त्या गांवचे इनामदार आहेत ते त्या गांवांत जाऊन पोहोंचले. त्यांच्या येण्याची खबर त्या म्हाताऱ्याच्या मुलास लागतांच तो त्यांच्याकडे गेला व त्यांजपाशीं महाराजांची त्यानें उदी मागितली. ती उदी त्यानें पाण्यांत घालून आपल्या बापाला पाजली आणि त्यानंतर पांच मिनिटांच्या आंत खडा आपोआप

लन्वीच्या द्वारें सटकन् बाहेर पडला. अर्थातच म्हातारा हुषार झाला आणि त्याची प्रकृती सुधारली.

मुंबईचा एक कायस्थ प्रभु गृहस्थ कांहीं महिने शिर्डीस राहिला होता. त्याची बायको गरोदर होती, तीहि त्याच्याबरोबर होती एके दिवशीं रात्रीं दहा वाजण्याच्या सुमारास तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. गांव लहान असल्यामुळें तेथें डॉक्टर किंवा वाकबगार सुईण मिळणें शक्य नव्हतें. शेजारच्या दोन बाया गेल्या व त्यांनीं पाहिलें तों पोर आडवें आलेलें होतें, आणि गर्भाची हालचाल कांहींच दिसेना, व बाईचा जीव कासावीस होऊं लागला. शेजारणी बायाही घाबरल्या. मग त्यांपैकीं एकीनें थोडी उदी पाण्यांत घालून त्या गरोदर बाईला पाजली, आणि बाबांचा धांवा केला. पांच मिनिटांच्या आंत पोर बाहेर पडलें. तें अगदीं हिरवेंनिळें झालेलें होतें. त्यावरून गर्भातच त्याचा प्राणांत होऊन कांहीं वेळ झाला असावा, असें दिसलें. पोर बाहेर पडल्यानें बाईचा जीव वांचला. हें बाळंतपण बाईला फारच कठीण जाईल, आणि बाईच्या जिवावर बेतेल, असें पुष्कळांनीं पूर्वीं भाकित केलें होतें, आणि म्हणून ती बाई आणि तिचा नवरा शिर्डीस जाऊन राहिलीं होतीं.

वांद्र्यास एक गृहस्थ आहेत त्यांना रात्रीं त्रास होत असे. त्यांना झोंप लागली कीं भयंकर स्वप्न पडावें, आणि त्यांनीं दचकून जागें व्हावें. हा प्रकार सतत कांहीं महिने चालू होता. एके दिवशीं त्या गृहस्थानें आपली हकीगत त्याच घराचे मालक जे माडीवर रहातात त्यांना सांगितली, व याला कांहीं उपाय सांगा असें म्हणाले. घराचे मालक बाबांचे पूर्ण भक्त असल्यामुळें त्यांनीं त्यांना थोडी उदी एका कागदाच्या पुडींत बांधून दिली, आणि ही निजतांना उशाखालीं ठेवा, असें सांगितलें. त्यांनीं त्याप्रमाणें केलें व त्या रात्रीं त्यांना स्वस्थ झोंप लागली. ती पुडी आतां ते नेहमीं उशाशीं ठेवितात, आणि आतां झोंपेसंबंधानें त्यांची तक्रार कांहीं राहिली नाहीं.

[illegible]यास एक गृहस्थ आहेत, त्यांना एकदां पटकीचा आजार झाला, आणि तो पुष्कळ उपायांनीं-कोणाचें कांहीं औषध न येतां बरा झाला असें त्यांनीच मला सांगितलें.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| महाराजांचे अनुभव — | | | |
| ,, ३८ | ११ | रमाणस | रामायण |
| ,, ४० | ८ | एपुष | एष्ष |
| ,, ,, | ११ | परज्योतिस्वरूपसंपद्य | परज्योतिरूपसंपद्य |
| ,, ४४ | ७ | जोपेश्वर | जपेश्वर |
| ,, ,, | १७ | महाराजानंत | महाराजानंद |
| ,, ४६ | १२ | महराजाचे | महाराजांचे |
| ,, ,, | १४ | यत्ताही | यताही |
| ,, ५१ | २५ | अवघ | अयव |
| स्फुट विषय — | | | |
| ,, १७ | ८ | [illegible] | [illegible] |
| ,, ,, | १७ | समथानीयाः | समर्थोत्तिया |
| ,, ,, | १० | मक्तोचे | भक्तांचे |
| ,, १८ | १२ | सच्चीदानंद | सच्चिदानंद |
| ,, १२ हे अभंग रा. रा. निळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांनी रचिले आहेत ते वे. शा. सं. कृ. जा. भीष्म यांचे नव्हेत. | | | |
| श्रीसाईसच्चरित — | | | |
| ,, ९६ | २७ | साई पाणी वाही | पाणी वाही |
| ,, ९८ | १५ | बडयांचा | बडव्यांचा |
| ,, ९९ फूट नोट "करीत" वर नसून "केली" या शब्दावर आहे. | | | |
| ,, १०२ | २२ | माशिदीत | मशिदींत |
| ,, १०५ | | काष्ट | कष्ट |
| ,, ,, | २१ | पश्चाताप | पश्चात्ताप |

# स्फुट विषय.

श्रीसाईनाथ यांचे शिर्डी येथील समाधीपुढें ता. २२।४।२३ पासून रा. रा. निळकंठराव गडी काठीकर म्यानेजर बुट्टी यांनीं दररोज म्हट-लेल्या कवितांपैकीं एक पद.

प्रार्थना-पद.

सर्व व्यापका आवाहन मी कोठें तुज देऊं ॥
जगदाधारा आसन तुजला कोणतें ठेऊं ॥ १ ॥

नित्य निर्मला विमला कमला घालिल कां स्नान ।
सर्व जगाला भोजन देशी ऐशा तुज अन्न ॥ २ ॥

नित्य पवित्रा आचमनानें पवित्र तुज भाऊं ॥
विश्वव्यापका शंका रहिता तुला कसें ध्याऊं ॥ ३ ॥

विश्वरूप हें ब्रह्मांडाचें उदरिं तुझ्या भरलें ॥
वस्त्रें देऊन तुला मजविणें आज कसें उरलें ॥ ४ ॥

निर्लेपा तुज अति प्रीतीनें गंध कसें लावूं ॥
निराकार तूं जगदंबे तुज उपवित कां देऊं ॥ ५ ॥

साई ठायीं नाच वासना पुष्प कक्षासाठीं ॥
नित्य सुंदरा रमावरा तुज भूषण करवंटी ॥ ६ ॥


अंत न ज्याला अशा विशाला प्रदक्षिणा कैसी ॥
निर्द्वंद्वाला एकरूपाला वंदनाच जैसी ॥ ७ ॥

कोण कुणाला वंदन करितो एकरूप होतां ॥
कोण कुणाला आलिंगिल हो रूपीं रूप मिळतां ॥ ८ ॥

सद्गुरु लागी शरण गेलिया शिष्या केवि उरे ॥
राम कृपेनें वानर हस्तें मस्तर जेवि तरे ॥ ९ ॥

ईश्वर चरणीं लीन झालिया मायाजंत्रि सुटे ॥
अद्वैताचे महासागरीं द्वैता स्थान कुठें ॥ १० ॥

साईनाथ कृपाप्रसादें सिद्धी नित्य जुडे ॥
गजाननाचें चरणीं मिळतां निळकंठ नच नांव पुढें ॥ ११ ॥



परी बाबा न लक्ष देती । ग्रामस्थांसींच उलट वदती ॥
नका सतावूं रोहिल्याप्रती । तो मज अति प्रिय वाटे ॥ ११९ ॥
या रोहिल्याची बाईल घरघुशी । नांदूं न घटे तयापाशीं ॥
यावया टोंके ती मजपाशीं । चुकवून त्याशीं ते विवशी ॥ १२० ॥
नाहीं रांडेला पडद पोशी । लाजलज्या लाविली वेशी ॥
हांकून बाहेर घालतां तिजशीं । बलात्कारेंसीं घर घुसे ॥ १२१ ॥
ओरडूं थांबे तेच संधी । शिरूं पाहे रांड दुर्बुद्धी ॥
तो ओरडतां ती पळे त्रिशुद्धी । सुख समृद्धी मज तेणें ॥ १२२ ॥
जावें न कोणी त्याच्या वाटे । ओरडूंद्या मुक्तकंठें ॥
तयावीण मज रात्र न कंठे । सौख्य मोठें तेणेंनी ॥ १२३ ॥
याची ही ओरड एणेंपरी । आहे मजदहु हितकारी ॥
ऐसा हा रोहिला परोपकारी ।[1] बहु सुखकारी मजलागीं ॥ १२४ ॥
ओरडूं द्या त्यास यथेष्ट । त्यांतची आहे माझें इष्ट ॥
नातरी ती रोहिली दुष्ट । देईल कष्ट मजलागीं ॥ १२५ ॥
स्वयेंच मग जें थकेल । आपोआप स्वस्थ राहील ॥
कार्यभाग तुमचा साधेल । मज होन वाजेल ती रांड ॥ १२६ ॥
असें म्हणतां महाराज । खुंटला मग तेथें इलाज ॥
बाबांच्या मनीं नाहीं गजबज । काय मग काज आम्हातें ॥ १२७ ॥
आधींच रोहिल्यास उल्हास । वरी हा आला फाल्गुनमास ॥
कलमें पडतां कंठशोष । असमसाहस मांडिला ॥ १२८ ॥
जन समस्त आश्चर्यापन्न । केवढे बाबा क्षमासंपन्न ॥
जेणें व्हावें मस्तक भिन्न । तेणेंच तल्लीन ते होती ॥ १२९ ॥

१ मनसोक्त २ ओरड, झगडेल. ३ ज्या ओरडांनें.

असतां जरी गर्क संसारीं । पडली संतकथा कानावरी ॥
यत्न न करितां तिळभरी । कल्याणकारी ती स्वभावें ॥ १५२ ॥
मग ती भक्ति भावें परिसतां । केवढें श्रेय चढेल हाता ॥
श्रोतां विचार करावा चित्ता । आपुल्या निजहिता कारणें ॥ १५३ ॥
जडेल तेणें गुरुपदीं प्रेम । वाढेल क्रमें आत्यंतिक क्षेम ॥
नलगे दुजी निष्ठा नेम । होईल परम कल्याण ॥ १५४ ॥
मना लावितां ऐसा निर्बंध । वाढेल कथा श्रवणछंद ॥
सहज तुटतील विषयबंध । परमानंद प्रकटेल ॥ १५५ ॥
ऐकूनी बाबांची मधुर वाणी । निर्धार केला मी निजमनीं ॥
एथूनी पुढें नरसेवा त्यागुनी । गुरुसेवनींच असावें ॥ १५६ ॥
परी मनास लागली हुरहुरी । 'मिळेल मेल्टी तया नोकरी' ॥
हें जें बाबा वदले उत्तरीं । प्रत्यंतरीं येणार कीं ॥ १५७ ॥
शब्द बाबांचा खालीं पडेल । हें तों सहसा कधींही न घडेल ॥
नरसेवेचा संबंध जडेल । परी न जोडेल हित मोठें ॥ १५८ ॥
स्वयंस्फूर्ति अण्णांची पृच्छा । खरी तथापि माझी ही इच्छा ॥
नव्हती ऐसें नाहीं, अनिच्छा । प्राक्तन भोगेच्छा ही नव्हे ॥ १५९ ॥
माझ्याही पोटीं नोकरी करावी । संसार निर्वाह मोठी लागावी ॥
साईही बोटानें गूळ दाखवी । परि पाजवी औषध ॥ १६० ॥
तें औषध या गुळाचे आशें । पिऊनी घालों भाग्यवशें ॥
नोकरीही अकल्पित लागली कामें । उद्यापिलाप स्वीकारिलें ॥ १६१ ॥

---

१ मुंबईसरकारचे चीफ सेक्रेटरी [illegible] असतांना हा लेखक त्यांचा शिरस्तेदार व मराठीचा [illegible] पेनशन [illegible] आणि [illegible] त्यांचे आग्रहावरून पेनशन [illegible]

गूळ झाला तरी शेवट । खातांखातां येणार वीट ॥
बाबांच्या उपदेशमधाचें बोट । चाखितां चोखट वाटलें ॥ १६२ ॥

नोकरी नव्हती चिरस्थाई । चालून गेली आलिया पायीं ॥
बाबांनीं बसविलें ठायींचेठायीं । सौख्य अनपायी भोगावया ॥१६३॥

हें विश्व संपूर्ण चराचर भग त्त्स्वरूपचि साचार ॥
परी भगवंत विश्वाहूनही पर । परात्पर परमात्मा ॥ १६४ ॥

ईश्वरप्रपंचेसीं अभिन्न । प्रपंचेसीं ईश्वरभिन्न
प्रपंच तेथून चेतनाचेतन । तया अधिष्ठान ईश्वर ॥ १६५ ॥

भगवंताचीं पूजास्थानें । अष्टप्रकार असती जाणे ॥
प्रतिमा स्थंडिलादि आनानें । सर्वां तुळणें गुरुश्रेष्ठ ॥१६६

कृष्णस्वयें ब्रम्हपूर्ण । तोही धरीसांदीपनी चरण ॥
म्हणे करितां सद्गुरुस्मरण । मी नारायण संतुष्ट ॥ १६७ ॥

मजहून मज सद्गुरुस्तवन । आवडे कीं सहस्रगुण ॥
ऐसें सद्गुरूचें वरिष्ठपण । महिमान गहन तयाचें ॥ १६८ ॥

गुरु भजना जो पाठिमोरा । तो एक अभागी पापी खरा ॥
भोगी जन्ममरणयेर झारा । करी मातेरा स्वार्थाचा ॥ १६९ ॥

मागुती जन्ममागुती मरण । हें तों लागलें निरंतर भ्रमण ॥
म्हणुनी करूंया कथाश्रवण । निजोद्धरण संपादूं ॥ १७० ॥

संत मुखींच्या सहज गोष्टी । अविद्येच्या तोडिती गांठी ॥
तारक होती अति संकटीं । म्हणोनि पोटीं साठवूं ॥ १७१ ॥

नकळे कैसा येईलवेळ । घालूनि देतील कैसा मेळा ॥
हा अल्लामियाचा सर्व खेळ । भक्त प्रेमळ प्रेक्षक ॥ १७२ ॥
गांठीस नसतां प्रज्ञाबळ । काय म्हणावें हें दैव सबळ ॥
जे मी लाधलों साई गुरु प्रबळ । हाही एक खेळ तयाचा ॥१७३॥
निवेदिलें ग्रंथ प्रयोजन । कथिलें मज दिधलें जें अश्वासन ॥
जेणें मत्परत्व आणि मत्पूजन । काय तें दिग्दर्शन जाहलें ॥१७४॥
आतां आपण श्रोतेजन । कराल पुढील अध्यायीं श्रवण ।
समर्थ साईनाथांचें अवतरण । शिरडींत कैसेन जाहलें ॥ १७५॥
लहान थोर तुम्ही सगळे । हें साईचें चरित्र आगळें ॥
होऊनि क्षणैक संसारावेगळे । परिसा भोळे भाविक हो ॥१७६॥
स्वयें जरी निर्विकारी । साई नट नाटकी अवतारी ॥
वर्ते माया कार्यानुसारी । जैसा व्यवहारीं प्रापंचिक ॥ ॥ १७७ ॥
'समर्थ साई' या अल्प मंत्रें । ध्याती जयाचीं पदें पवित्रें ॥
हाल्वी जो भक्त भवमोक्ष सूत्रें । पावन चरित्रें तयाचीं ॥१७८॥
एवंच पावन साई चरित्र । वाची तयाचें पावन वक्र ॥
श्रोतियाचें पावन श्रोत्र । होईल पवित्र अंतरंग ॥ १७९ ॥
प्रेमें करितां कथाश्रवण । होईल भव दुःखाचें हरण ॥
ओळेल साई कृपाघन । प्रगटेल संपूर्ण शुद्धबोध ॥ १८०
लयविक्षेप आणि कषाय । रसास्वाद हे श्रवणा अपाय ॥
दूरसाराहे अंतराय । श्रवण सुखदायक होईल ॥ १८१ ॥
नलगे व्रत उद्यापन । नलगे उपवास शरीरशोषण ॥
नलगे तीर्थ यात्रापर्यटण । चरित्र श्रवण एक पुरे ॥ १८२ ॥

प्रेम असावें अकृत्रिम । जाणिलें पाहिजे भक्तिवर्म ॥
सहज लाधेल परमार्थ परम । नासेल अविषम अविद्या ॥ १८३ ॥

नलगे इतर साधनीं शीण । करूं हें साईचरित्र श्रवण ॥
संचित आणि क्रियमाण । अल्पप्रमाण ही नुरवूं ॥ १८४ ॥

कृपण बापुडा कवण्याही गावा । चित्तासमोर पुरलेला ठेवा ॥
जैसा तयासी अहर्निशि दिसावा । तैसाची वसावा साई मनीं ॥१८५॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साईसमर्थ सच्चरिते । ग्रंथप्रयोजनानुज्ञापनं नाम ॥
त्रितीयोऽध्यायः

श्री साईनाथार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

# अध्याय ४ था.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
श्रीसद्गुरु साईनाथायनमः

पूर्वील दो अध्यायीं मंगलाचरण । कथिलें ग्रंथप्रयोजन ॥
अधिकारी अनुबंध निरूपण । सांग विवरण जाहलें ॥ १ ॥

आतां या संतांचा अवतार । किंनिमित्त ये धरित्रीवर ॥
ऐसें हें काय कर्म खडतर । जेणें ते अवतरत भूलोकीं ॥ २ ॥

आतां श्रोते महाराज । मी एक तुमचा चरणरज ॥
मज तों अवधान कृपेचें काज । मागतां लाज मज नाहीं ॥ ३ ॥

आधींच गोड संतचरित्र । तशांत हें तो साई कथामृत ॥
सेवूनी साईचे अनन्य भक्त । आनंद युक्त होवोत ॥ ४ ॥

ब्राह्मण हेळसिती आश्रम वर्ण । शूद्र होऊं पाहती ब्राम्हण ॥
धर्माचार्यांचें मान खंडण । करूं दंडण पहातीं ॥ ५ ॥

कोणी न मानी धर्मवचन । घोरोघरीं सर्वचि विद्वान ॥
एकावरतीं एकाची ताण । मानीना कोण कोणाचें ॥ ६ ॥

सेव्यासेव्य भक्ष्याभक्ष्य । आचारविचारीं पूर्ण दुर्लक्ष ॥
मद्य मांस अवघ्यांसमक्ष । ब्राम्हण प्रत्यक्ष सेविती ॥ ७ ॥

घेऊन धर्माचें पांघरुण । अत्याचार चालविती आंतून ॥
पंथद्वेष जाती माजून । जन जाजाऊन जाती जैं ॥ ८ ॥
ब्राम्हण कंटाळती संध्यास्नाना । कर्मठ कंटाळती अनुष्ठाना ॥
योगी कंटाळती जप तप ध्याना । संतावतरणा समय तो ॥ ९ ॥
जन धन मान पुत्र दारा । हाचि सुख सर्वस्वा थारा ॥
मानूनि विन्मुख परमार्थ विचारा । संत अवतारा तैं येती ॥ १०॥
आत्यंतिक श्रेयप्राप्ति । धर्म ग्लानी पायीं जैं मुकती ॥
करावया धर्म जागृती । संत येती आकारा ॥ ११ ॥
आयुरारोग्य ऐश्वर्या मुकती । जन शिस्नोदर परायण बहकती ॥
निजोद्धरणा सर्वस्वी हुकती । अवतारा येतीतैं संत ॥ १२
व्हावया वर्णाश्रमधर्मरक्षण । करावयां अधर्माचें निर्दळण ॥
दीन गरीब दुबळ्यांचें संरक्षण । क्षितीं अवतरण संतांचें ॥ १३ ॥
संत स्वयें ठायींचें मुक्त । दीनोद्धरणीं सदैव उद्युक्त ॥
अवतार तयांचा केवळ परार्थ । निजस्वार्थ त्यांनाहीं ॥ १४ ॥
निवृत्तीचा पाया भरती । प्रवृत्तीच्या होळ्याभवतीं ॥
परमार्थाचें मंदिर उभारती । भक्तां उद्धरती सहज गती ॥ १५ ॥
धर्मकार्य धर्म जागृति । करून अवतारकार्य संपादिती ॥
होतां निजकार्य परिपूर्ति । अवतार समाप्ति करितात ॥ १६ ॥
सकल जगदानंदकरू। प्रत्यगात्माच परमेश्वरु ॥
जो परमेश्वरू तोच गुरु । तोच शंकरू सुखकरू॥ १७॥
तोच तो निरतिशय प्रेमास्पद । नित्य निरंतर अभेद ॥
नेणें जो देश काल वस्तु भेद । परिच्छेदातीत जो ॥ १८ ॥
परापश्यंति मध्यमा वैखरी । वाणी वर्णितां थकल्या चारी ॥
'नेति नेतीति घेतली हारी । वेदीं चातुरी चालेना ॥ १९ ॥

लाजलीं शट्शास्त्रें शद्दर्शनें । थकलीं पुराणें आणि कीर्तनें ॥
अखेर काया वाचा मनें । ठरलीं नमनेच साधनें ॥ २०॥
पंसिया संत साईचें चरित्र । लीला जयाच्या अत्यंत विचित्र ॥
परिसोन जयाच्या कथा पवित्र । पावनश्रोतृ होउतका ॥ २१ ॥
तोच चालक सकलेंद्रियां । बुद्धि देई ग्रंथरचाया ॥
यथाक्रम चरित्र सुचाया । अनायासें कारण तो ॥ २२ ॥
तो सर्वांचा अंतर्यामी । बाह्याभ्यंतर सर्वगामी ॥
मग हे काळजी करावी कां मी । व्यर्थ रिकामी किमर्थ ॥ २३ ॥
गुण एकेक तयाचे आठवितां । पडे वृत्तीस ताटस्थता ॥
येईल वाचेस कैसा तो वर्णितां । दृढ मौनता तत्कथन ॥ २४ ॥
घ्राणें सुमन हुंगावें । त्वचा शीतोष्ण स्पर्शावें ॥
नयनें सौंदर्य सुखघ्यावें । सुखवावें आपापणां ॥ २५ ॥
जिव्हा शर्करेचा स्वाद । जाणे परीनेणें अनुवाद ।
तैसाच साई गुणानुवाद । करूं विशद नेणें मी ॥ २६ ॥
सद्गुरुचेच जंव येई मना । तोच स्वयें देई प्रेरणा ॥
अनिर्वचनीयाचे निर्वचना । स्वजना करवीं करवीतो ॥ २७ ॥
हा न केवळ शिष्टाचार । बोल हे न केवळ उपचार ॥
मनोभावाचे हे उद्गार । अवधानादर प्रार्थितों ॥ २८ ॥
जैसें गाणगापूर नृसिंहवाडी । जैसें औदुंबर वा भिल्लवडी ॥
तैसेंच पवित्र गोदेचे थडी । क्षेत्र शिरडी प्रसिद्ध ॥ २९ ॥
गोदावरीचें पवित्र तीर । गोदावरीचें पवित्र नीर ॥
गोदावरीचा शीतसमीर । हीं भवतिमिर नाशक ॥ ३० ॥
गोदावरीचें महात्म्य रुचिर । प्रख्यात जें अखिल जगतीवर ॥
एकाहून एक धुरंधर । संत प्रवर तें झाले ॥ ३१ ॥

अनेक तीर्थं या गोमती तीरीं । अघविनाशक जेथील वारी ॥
भवरोग स्नानें पानें निवारी । पुराणांतरीं वर्णिलें ॥ ३२
ते हे गोदा अहमदनगरीं । कोपरगांव तालुक्याभीतरीं ॥
कोपरगांवाचिया शेजारीं । मार्ग देई शिरडीचा ॥ ३३ ॥
गोदा वळंघून पैलतीरीं । सुमारें तीन कोसांवरी ॥
तांगा प्रवेशतां निम गांवाभीतरीं । समोर शिरडी दिसतसे ॥ ३४॥
निवृत्ति ज्ञानदेव मुक्ताबाई । नामा जनी गोरा गोणाई ॥
तुका नरहरी नरसी भाई । सजन कसाई सांवता ॥ ३५ ॥
पूर्वीं संत होऊनि गेले । सांप्रतही ते बरेच झाले ॥
हे वसुधैव कुटुंबीं भले । आधार रंजले गांजल्याचे ॥ ३६ ॥
रामदास संत प्रवर । सोडूनियां गोदातीर ॥
प्रकट झाले कृष्णा तटाकावर । जगदुद्धाराकारणें ॥ ३७ ॥
तैसेच हे योगेश्वर साई । महान शीरडीची पुण्याई ॥
जगदुद्धाराचिये पायीं । गोदे ठायीं अवतरले ॥ ३८ ॥
परीस लोहा दे कनक स्थिति । तया परीसा संतां उपमिती ॥
संतांची परी अलौकिक कृति । निजरूप देती भक्तांतें ॥३९॥
मोडूनियां भेदभाव । स्थिरचर अवघें ब्रम्हस्व भाव ॥
आपणांसह हें विश्वविभव । अखंड वैभव ब्रम्हाचें ॥ ४० ॥
ऐसें अखिल विश्व जेव्हां । मी च मी हें प्रबोधेल तेव्हां ॥
मग त्या सुखाचा काय सुहावा । परम सद्भावा पावेल ॥ ४१ ॥
ऐसें मीपण जेव्हां पावावें । वैर तें करावें कोणासवें ॥
किमर्थ वा कवणास भ्यावें । अन्यचि ठावें जंव नाहीं ॥४२॥
दामाजी जैसे मंगळवेढीं । समर्थ रामदास सज्जनगडीं ॥
नृसिंहसरस्वती जैसे वाडी । तैसेच शिरडी साईनाथ ॥ ४३ ॥

परम दुर्घट आणि दुस्तर । जिंकिला जयानें हा संसार ॥
शांती जयाचा अलंकार । मूर्त भांडार ज्ञानाचें ॥४४॥
वैष्णवांचें हें माहेर घर । उदारांचा हा उदार ॥
परमार्थ कर्णाचा अवतार । साराचें सार हा साई ॥ ४५ ॥
प्रीति नाहीं नाशिवंतीं । आत्मस्वरूपीं रंगली वृत्ती ॥
लक्षएक परमप्राप्ति । कायतं स्थिति वर्णावी ॥ ४६ ॥
ऐहिकाचा न उत्कर्षापकर्ष । आमुत्रिकाचा न हर्षामर्ष ॥
अंतरंग निर्मल जैसा आदर्श । वाचा वर्षत अमृत सदां ॥ ४७ ॥
राजा रंक दरिद्रीदीन । जयाचे दृष्टी समसमान ॥
स्वयें ठावा न मानापमान । भूतीं भगवान भरलेला ॥ ४८ ॥
जनासवें बोलेचाले । पाही मुरल्यांचे नाच चाळे ॥
गज्जल गाणें ऐकतां डोले । रेस न हाले समाधि ॥ ४९ ॥
अल्ला नामाची जया मुद्रा । जग जागतां जयाये निद्रा ॥
जागे जगास लागतां तंद्रा शांतसमुद्रा समउदर ॥ ५० ॥
आश्रम निश्चय कांहीं नकळे । कांहीं निश्चित कर्मा नातळे ॥
बहुधा बसल्या ठायींचा न ढळे । व्यवहार सगळे जो जाणे ॥५१॥
दरबाराचा बाह्य थाट । गोष्टी सांगे तीनशें साठ ॥
ऐसा जरी नित्याचा थाट । मौनाची गांठ सोडीना ॥ ५२ ॥
भिंतीसटेंकून उभे असतां । सकाळा दुपारा फेरी फिरती ॥
लेंडीवरी वा चावडीस जाती । आत्मस्थिति अखंड ॥ ५३ ॥
न जाणं कवण्या जन्मांतरीं । कवण्या प्रसंगीं कवण्या अवसरीं ॥
केलें ग्यां तप कैशियापरी । घेतलें पदरीं साईनें ॥ ५४ ॥
हें काय म्हणावें तपाचें फळ । तरी मी तो जन्माचा खळ ॥
साईच स्वयें दीनवत्सल । कृपा ही निश्चळ तयाची ॥ ५५ ॥

सिद्द कोटींत जरी जनन । साधका ऐसें तयाचें वर्तन ॥
वृत्ति निरभिमान अतिलीन । राखी मन सकळांचें ॥ ५६ ॥
नाथांहीं जैसें केलें पैठण । ज्ञान देवांही आळंदी जाण ॥
तैसेंच साईनीं शिरडी स्थान । महिमा संपन्न केलें कीं ॥ ५७ ॥
धन्य शिरडीचे तृण पाषाण । अनायासें जयां अनुदिन ॥
घडलें बाबांचें चरणचुंबन । पदरजधारण मस्तकीं ५८ ॥
शिरडीच आम्हां पंढरपूर । शिरडीच जगन्नाथ द्वारकानगर ॥
शिरीच गया काशी विश्वेश्वर रामेश्वरही शिरडीच ॥ ५९ ॥
शिरडीच आह्मां बद्रिकेदार । शिरडीच नाशीक त्र्यंबकेश्वर ॥
शिरडीच उज्जयिनी महाकाळेश्वर । शिरडीच महाबळेश्वर गोकर्ण ६०॥
शिरडींत साईचा समागम । तोच आम्हा आगम निगम ॥
तोच सकळ संसारोपशम । अत्यंत सुगम परमार्थ ॥ ६१ ॥
समर्थ साईचें जें दर्शन । तेंचि आम्हां योगसाधन ॥
करितां तयांसीं संभाषण । होय क्षालन पापाचें ॥ ६२ ॥
तयांचें जें चरण संवाहन । तेंचि अम्हां त्रिवेणी स्नान
तयांचें चरणतीर्थ सेवन । तेंचि निर्मूलन वासनांचें ॥ ६३ ॥
तयांचें जें आज्ञापन । तेंचि आम्हां वेद वचन ॥
तयाच्या उदी प्रसादाचें सेवन । पुण्यपावन सर्वांथीं ॥ ६४ ॥
साईच आम्हा परब्रम्ह । साईच आमुचा परमार्थ परम
साईच श्रीकृष्ण श्रीराम । निजाराम श्रीसाई ॥ ६५ ॥
साई स्वयें द्वंद्वातीत । कधीं न उद्विग्न वा उल्लसित ॥
सदैव निजस्वरूपीं स्थित । सदोदित सन्मात्र ॥ ६६ ॥
शिरडी केवळ केंद्रस्थान । क्षेत्र बाबांचें अति विस्तीर्ण ॥
पंजाब कलकत्ता हिंदुस्थान । गुजराथ दख्खन कानडा ॥ ६७ ॥

शिरडीची साईची समाधि । तीच अखिल संतांची मांदीं ॥
जेथील मार्ग क्रमतां प्रतिपदीं । तुटते ग्रंथी जीवाची ॥ ६८ ॥
सार्थक जन्मा आलियाचें । केवळ समाधिदर्शन साचें ॥
मग सेवेसीं जयांचें आयुष्य वेचे ॥ भाग्य तयांचें काय वानूं ॥६९॥
मशीद आणि वाडीयांवरी । सुंदर निशाणांच्या हारी ॥
फडकती उंच गगनोदरीं । पालवती करीं भक्तांसी ॥ ७० ॥
बाबा महंत प्रसिद्ध कीर्ति । गांवो गांवीं पसरली महती ॥
कोणी तयां सत् श्रद्धानवसिती । दर्शनें निवती जन कोणी ॥७१॥
कोणाचें कैसेंही मनोगत । असो बुद्धी शुद्ध वा कुत्सित ॥
दर्शनमात्रेंच निवे चित्त । जन विस्मित अंतरीं ॥ ७२ ॥
पंढरीत विठ्ठल रखुमाई । यांच्या दर्शनीं जी नवलाई ॥
तेंच विठ्ठल दर्शन देई । बाबा साई शिरडींत ॥ ७३ ॥
कोणास वाटल्याही अतिशयोक्ति । ऐकावी गौळीबुवांची उक्ति ॥
जयास दृढ विठ्ठलाची भक्ति संशय निवृत्ति होईल ॥ ७४ ॥
पंढरीचे हे वारकरी । जैशी वर्षास पंढरीची फेरी ॥
तैशीच करिती हे शिरडीची वारी । प्रेम भारी बाबांचें ॥ ७८ ॥
गर्दभ एक बरोबर । शिष्य एक साथीदार ॥
जिव्हा 'रामकृष्ण हरी' गजर । करी निरंतर बुवांची ॥ ७९ ॥
पंचाग्नितपें वर्षें ययास । चातुर्मासीं गंगातट निवास ॥
पंढरपुरीं अष्टमास । भेटी वर्षास बाबांची ॥ ८० ॥
बाबाकडे पहात पहात । म्हणावें यांना होऊनि विनत ॥
हाचि हा पूर्ण पंढरीनाथ । अनाथ नाथ दयाळ ॥ ८१ ॥

१ मूर्तिमंत

धोत्रें नेसून रेशीम कानीं । होतील काय संत कोणी ॥
करुं लागती हाडांचे मणी । रक्ताचें पाणी निजकष्टें ८२ ॥
फुकाचा काय होईल देव । हाच हो प्रत्यक्ष पंढरीराव ॥
जग वेडें रे वेड हाहृढ भाव । ठेवूनि देव लक्षावा ॥ ८३ ॥
जया पंढरीनाथाची भक्ति । ऐसिया भगवद्भक्ताची हे उक्ति ॥
तेथ मजपामराचा अनुभव किती । श्रोतां प्रतीति पहावी ॥ ८४ ॥
नाम स्मरणीं मोठी प्रीति । 'अल्ला मालीक' अखंड वदती ॥
नाम सप्तें करवून घेती । दिवस राती सन्मुख ॥ ८५ ॥
आज्ञा एकदां दास गणूला । नाम सप्ताह मांडावयाला ॥
होतां गणुदास वदती तयांला । विठ्ठल प्रगटला पाहिजे ॥ ८६ ॥
बाबा तंव छातीस हात लाविती । दासगणूस निक्षून वदती ॥
'होहो प्रगटेल विठ्ठल मूर्ती । भक्त भावार्थी पाहिजे' ॥ ८७ ॥
'डाकुरनाथाची डंकपुरी । अथवा विठ्ठलरायाची पंढरी' ॥
'ती हीच रणछोड द्वारकानगरी । जाणे न दूरी पहावया' ॥८८॥
'विठ्ठल काय एकांतीचा उठून । येणार आहे दुसरा कुठून' ॥
'भक्त प्रेमें उत्कंठून । एथेंही प्रगटून राहील' ॥ ८९ ॥
पुंडलिकें वडिलांची सेवा । करून भुलविलें देवाधिदेवा ॥
पुंडलिकाच्या त्या भक्ति भावा । विटे विसांवा घेतला ॥ ९० ॥
असो होतां सप्त्याची समाप्ति । झाली म्हणती दासगणू प्रति ॥
शिरडीस विठ्ठल दर्शन प्राप्ती । ही घ्या प्रतीति बाबांची ॥ ९१ ॥
एकदां काका साहेब दीक्षित । नियमानुसार प्रातःस्नात ॥
असतां आसन स्थित ध्यानस्थ । दर्शन पावत विठ्ठलाचें ॥ ९२ ॥
पुढें जातां बाबांचे दर्शना । नवल बाबा पुसती तयांना ॥
विठ्ठलपाटील आला होताना ? । भेट झालीना ? तयाची ॥९३॥

मोठा पळपुट्या बरें तो विठ्ठल । मख मारूनि करी त्या अढळ ॥
दृष्टी चुकवूनि काढील पळ । होतां पळ एक दुर्लक्ष' ॥ ९४ ॥
होतो प्रातःकाळीं प्रकार । पुढें जेव्हां भरली दुपार ॥
पहा आणिक प्रत्यंतर । विठ्ठलदर्शन सोहळा ॥ ९५ ॥
पंढरपुरच्या विठोबाच्या । छब्या पांचपंचविस साच्या ॥
घेऊनि कोणीं बाहेरगावींचा । विकावयाच्या इच्छे ये ॥ ९६ ॥
सकाळध्यानीं आली ती मूर्ती । तियेचीच संपूर्ण होती प्रतिकृती ॥
पाहूनि दीक्षित विस्मित चित्तीं । बोल आठवती बाबांचे ॥ ९७ ॥
दीक्षित तव अति प्रीती । विकणारासी मोल देती ॥
छबी एक विकतघेती ॥ भावें लाविती पूजेस ॥ ९८ ॥
विठ्ठल पूजूनीं साईचा आदर । आणीक एक कथानक सुंदर ॥
परिसा बहु श्रवण मनोहर । आनंद निर्भर मानसें ॥ ९९ ॥
भगवंतराव क्षीरसागर । वडील विठ्ठल भक्त प्रवर ॥
पंढरपुरास वारंवार । फेरी वरचेवर करीत ॥ १०० ॥
घरांत होती विठ्ठल मूर्ती । वडील पंचत्व पावल्यावरती ॥
जाहली पूजानैवेद्य समाप्ती । श्राद्धतिथीही राहिली ॥ १०१ ॥
नाहीं वारीची कथावार्ता । भगवंतराव शिर्डीस येतां ॥
बाबा आठवूनि तयाचा पिता । म्हणती 'तो होता दोस्त माझा १०२
हा त्या माझ्या स्नेह्याचा सुत । म्हणून यास मीं आणिला खेंचित
नाहीं कधीं हा नैवेद्य करीत । उपासी ठेवित मजलाही ॥ १०३ ॥
विठ्ठलासही ठेवी उपाशी । म्हणून शिरडीस आणिलें यासीं ॥
आतां देईन आठवणीसी । लाविन पूजेसी याजला '॥ १०४ ॥
एकदां पर्वविशेष जाणून । करावें प्रयागतीर्थीं स्नान ॥
दास गणूचें जाहलें मन । आले आज्ञापन घ्यावया ॥ १०५ ॥

बाबा देती प्रत्युत्तर । नलगे तदर्थ जाणें दूर ॥
हेंच आपुलें प्रयागतीर । विश्वास धर दृढ मनीं ॥ १०६ ॥
खरेंच सांगावें काय कौतुक । बाबांचें चरणीं ठेवितां मस्तक ॥
उभयांगुष्ठीं निथळलें उदक । गंगायमुनोदक पाझरलें ॥ १०७ ॥
पाहूनियां तो चमत्कार । दास गणूस आला गहिंवर ॥
काय बाबांचा महदुपकार । फुटला पाझर नयनास ॥ १०८ ॥
वैखरीस चढलें स्फुरण । प्रेम आलें उचंबळून ॥
अगाधशक्ति अघटित लीला वर्णन । करून समाधान पावलें ॥ १०९ ॥
दास गणूचें पद हें गोड । वेळींच पुरावें श्रोतियांचें कोड ॥
ह्मणोनि त्या प्रासादिक पदाची जोड । देवोनि ही होइ पुरविती ॥ ११० ॥

## पद.

अगाध शक्ती अघटित लीला तव सद्गुरुराया ।
जडजीवातें भविं ताराया तूं नौका सदया ॥ ध्रु० ॥
वेणीमाधव आपण होऊनि प्रयाग पद केलें ॥
गंगा यमुना द्वय अंगुष्ठीं प्रवाह दाखविलें ॥ १ ॥
कमलोद्भव कमलावर शिवहर त्रिगुणात्मक मूर्ती ॥
तूंचि होऊनि साई समर्थ विचरसि भूवरती ॥ २ ॥
प्रहर दिसाला ब्रह्म्यासम तें ज्ञान मुखें वदसी ॥
तमा गुणाला धरुनि रुद्र रूप कधिं कधिं दाखविसी ॥ ३ ॥
कधीं कधीं श्रीकृष्णासम त्या बाल लीला करिसी ॥
भक्त मनानित सरस करूनी मराळ तूं बनसी ॥ ४ ॥
यवन ह्मणावें तरि ठेविसी गंधावर प्रेमा ॥
हिंदु ह्मणूं तरि सदैव वससी मशिदित सुखधामा ॥ ५ ॥

धनिक म्हणावें जरी तुला तरी भिक्षाटण करिसी ॥
फकिर म्हणावें तरी कुबेरा दानें लाजविसी ॥ ६ ॥
तवों कसातें मशिद म्हणूं तरी वन्ही ते ठाया ॥
धुनित सदां प्रज्वळीत राहे उदि लोकां द्याया ॥ ७ ॥
सकाळपासुनी भक्तसावडे पूजन तव करिती ॥
माध्यान्हीला दिनकर येतां होत असे आरती ॥ ८ ॥
चहुंबाजूला पार्षदगणसम भक्त उभे राहती ॥
चौरि चामरें करीं धरूनि तुजवर ढाळीती ॥ ९ ॥
शिंग घडयाळें सूर सनय्या दणदणते घंटा ॥
चोपदार ललकारिति द्वारीं घालुनिया पट्टा ॥ १० ॥
आरति समयीं दिव्यासनिं तूं कमलावरदिससी ॥
प्रदोषकाळीं बसुनि धुनिपुढें मदनदहन होसी ॥ ११ ॥
अशया लिला त्या त्रयदेवांच्या प्रत्यहि तव ठायीं ॥
प्रचीतीस येताती अपुच्या हे बाबा साई ॥ १२ ॥
ऐसें असतां उगींच मन्मन भटकत हें फिरतें ॥
आतां विनंती हीच तुला या स्थीर करी त्यातें ॥ १३ ॥
अधमाधम मी महापातकी शरण तुझ्या पायां ॥
आलों, निवारा दासगणांचे त्रिताप गुरुराया ॥ १४ ॥

---

असो अघोर पापें धुवाया । जन जाती गंगेच्या ठाया ॥
गंगा लागे संताचे पाया । निवाराया निजतापें ॥ १११ ॥
सोडूनिया चरणापवित्रा । नलगे गंगा गोदा यात्रा ॥
भावें परिसा या संत स्तोत्रा । गोडचरित्रा साईच्या ॥ ११२

जैसे गोणाईस भीमरथींत । तमालास भागीरथींत ॥
नामा कबीर शिंपल्या आंत । सुदैवें प्राप्त जाहले ॥ ११३ ॥
तैसेच हे श्रीसाईनाथ । तरुण सोळा वर्षांचे वयांत ॥
निंबातळीं शिरडी गांवांत । प्रथम भक्तार्थ प्रगटले ॥ ११४ ॥
प्रगटतांच ब्रम्हज्ञानी । नाहीं विषयवासना स्वप्नीं ॥
माया त्यागिली लाथेहाणुनी । मुक्ति चरणीं विनटली ॥ ११५ ॥
जन्म बाबांचा कोण्या देशीं । अथवा कोण्या पवित्र वंशीं ॥
कोण्या मातापितरांच्या कुशी । हे कोणासी ठावेना ॥ ११६ ॥
ठावी न कोणा पूर्वावस्था । कोणतो तात वा कोण माता ॥
थकले समस्त पुसतां पुसतां । कोणा न पत्ता लागला ॥ ११७ ॥
सोडूनि माता पितर आप्त । गणगोत आणि जात पात ॥
त्यागूनि सकल संसार जात । प्रगटला जनहितार्थ शिरडींत ॥ ११८ ॥
शिरडीची एक वृद्ध बाई । नाना चोपदाराची आई ॥
कथिती झाली परम नवलाई । बाबा साई चरिताची ॥ ११९ ॥
ह्मणे आरंभीं हें पोर । गोरें गोमटें अति सुंदर ॥
निंबातळीं आसनीं स्थिर । प्रथम दृग्गोचर जाहलें ॥ १२० ॥
पाहूनि सुंदर बाळरूप । लोकांमनीं विस्मय अमूप ॥
कोंवळ्या वयांत खडतर तप । शीत आतप समसाम्य ॥ १२१ ॥
वय कोंवळें नवल स्थिती । ग्रामस्थ सकळ विस्मय पावती ॥
गांवोगावींचे लोक येती । दर्शन निमित्तीं मुलाच्या ॥ १२२ ॥
दिवसा नव्हे कोणाची संगती । रात्रीस नाहीं कोणाची भीती ॥
आली कोठून ही बाळ मूर्ति । आश्चर्य चित्तीं सकळीकां ॥ १२३ ॥
रूप रेखा अतिगोजिरी । पाहतां प्रेम दाटे अंतरीं ॥
नाहीं कुणाचें घरीं ना दारीं । लिंबाशेजारीं अहर्निश ॥ १२४ ॥

जो तो करी आश्चर्य थोर । ऐसें कसें तरी हें पोर ॥
वय कोंवळें रूप मनोहर । राही उघड्यावर रात्रंदिन ॥ १२५ ॥
बाह्यात्कारीं दिसे पोर । परी कृतीनें थोरांहुनी थोर ॥
वैराग्याचा पूर्णावतार । आश्चर्य फार सकळिकां ॥ १२६ ॥
एके दिवशीं नवल झालें । खंडोबाचें वारें आलें ॥
दोघे चौघे घुमूं लागले । पुसूं लागले जन प्रश्न ॥ १२७ ॥
कोणा सभाग्याचें हें पोर । कोठून कैसें हें आलें इथवर ॥
देवा खंडोबा तूं तरी शोध कर । प्रश्न विचारीत तैं एक ॥ १२८ ॥
देव म्हणे कुदळी आणा । दावितों ते जागीं खणा ॥
लागेल या पोराचा ठिकाणा । कुदळी हाणा ये जागीं ॥ १२९ ॥
मग तेथेंच त्या गांवकुसाजवळी । त्याच निंबवृक्षाचे तळीं ॥
मारितां कुदळीवर कुदळी । विटा ते स्थळीं आढळल्या ॥ १३० ॥
पुरा होतांच विटांचा थर । जात्याची तळी सारितां दूर ॥
दृष्टीस पडलें एक भुयार । समया चार जळती जें ॥ १३१ ॥
चुनेगच्ची तें तळघर । गोमुखी, पाट माळ सुंदर ॥
देव म्हणे बारा वर्षें हा पोर । तप आचरला येस्थळीं ॥ १३२ ॥
मग जन सर्व आश्चर्य करिती । खोद खोदून पोरास पुसती ॥
पोर तो बारा मुलखाचा गमती । कथा भलतीच सांगितली ॥१३३॥
म्हणे हें माझ्या गुरूचें स्थान । अति पवित्र हें माझें वतन ॥
आहे तसेंच करा हें जतन । माना मद्वचन एवढें ॥ १३४ ॥
बाबा झालें ऐसें बोलतें । कथिते झाले श्रवण करितें ॥
बाबा वदले तें वदले भलतें । ऐसी ही वळते जिव्हा कां ॥ १३५ ॥
आश्चर्य वाटे माझेंचि मज । बाबा विषयीं हा कां समज ॥
परी तो आतां पडला उमज । असेल सहज विनोद हा ॥ १३६ ॥

बाबा मूळचेच विनोदप्रिय । असेलही भुयार त्यांचेच आलय ॥
परी गुरूचें म्हणतां काय जाय । महत्व काय वेचेंकी ॥ १३७ ॥
असो बाबांच्या आज्ञेवरून ॥ पूर्वीप्रमाणें विटा लावून ॥
भुयार टाकिले बंद करून । निज गुरुस्थान म्हणून तें ॥ १३८ ॥
जैसा अश्वत्थ वा औदुंबर । तैसाच बाबांस तो निंबतरुवर ॥
प्रीति फार त्या निंबावर । अति आदर तयाचा ॥ १३९ ॥
म्हाळसापति आदिकरून । जुने शिरडीचे ग्रामस्थ जन ॥
बाबांच्या गुरूचें हें समाधिस्थान । म्हणून वंदन त्या करिती ॥ १४० ॥
तया समाधि सन्निधानीं । द्वादश वर्षें मौन धरुनी ॥
तपश्चर्या केली बाबांनीं । प्रसिद्ध जनीं ही वार्ता ॥ १४१ ॥
समाधि आणि निंब समेत । चौफेर जागा घेऊनि विकत ॥
साठे साहेब बाबांचे भक्त । चौसोपी इमारत उठविती ॥ १४२ ॥
हीच इमारत हाच वाडा । यात्रेकरूंचा मूळ आखाडा ॥
आलिया गेलियांचा राडा । एकचि गाढा ते स्थानीं ॥ १४३ ॥
बांधिला साठ्यांनीं निवास पार । माड्या काढिल्या दक्षिणोत्तर ॥
उत्तरेचा जिना तयार । करितां हें भुयार दाखविलें ॥ १४४ ॥
जिन्या खालीं दक्षिणाभिमुख । कोनाडा एक आहे सुरेख ॥
तेथेंच पागावर तयासन्मुख । भक्त उदङ्मुख बैसती ॥ १४५ ॥
'गुरुवार आणि शुक्रवारीं । सूर्यास्तीं सारवूनियां वरी ॥
ऊद जाळील जो क्षणभरी । देईल श्रीहरि सुख तया' ॥ १४६ ॥
ही अतिशयोक्ति किंवा खरें । साशंक होतील श्रोत्यांचीं अंतरें ॥
परी हीं साई मुखींचीं अक्षरें । श्रवण द्वारें परिसिली ॥ १४७ ॥
नाहीं माझिया पदरचें विधान । शंका न धरा अणु प्रमाण ॥
प्रत्यक्ष ज्यांनीं केलें हें श्रवण । ते आज विद्यमान असती कीं ॥ १४८ ॥

पुढें झाला दीक्षितांचा वाडा । सोय झाली प्रशस्त बिऱ्हाडां ॥
अल्पकालांत तेथेंच पुढां । दगडीवाडा ही ऊठला ॥ १४९ ॥
दीक्षित आधींच पुण्यकिर्ति । भावार्थाची ओतीव मूर्ति ॥
आंग्लभूमीचे यात्रेस जाती । तेथ रोविती निज बीज ॥ १५० ॥
येथें श्रोते घेतील शंका । सोडूनि मथुरा काशी द्वारका ॥
धर्म बाह्यजी आंग्ल भूमिका । परमार्थदायका कैसीपा ॥ १५१ ॥
श्रोत्यांस शंका ही साहजीक । निरसितां ती वाटेल कौतुक ॥
विपयांतर घडेल अल्पक । क्षमा सकळिक करितील ॥ १५२ ॥
काशी प्रयाग बदरिकेदार ॥ मथुरा वृंदावन द्वारकापुर ॥
इत्यादि यात्रा पुण्य निकर । पदरीं पूर्वींच तयांचे ॥ १५३ ॥
शिवाय वडिलांची पुण्याई । धन्य भाग्याची अपूर्वाई ॥
सर्व पुर्वार्जिनाची भरपाई । जाहलें साई दर्शन ॥ १५४ ॥
या दर्शना आदी कारण । भावतनीचें पांगुळ पण ॥
आंग्ल भूमींत असतां जाण । पाय निसरुन जें आलें ॥ १५५ ॥
दिसाया दिसला जरी कुयोग । तरी परिपाकें गुरुपुण्ययोग ॥
तेणें फळला सद्योग । अलभ्य संयोग साईचा ॥ १५६ ॥
चांदोरकरांची गांठ पडली । साईची कीर्ति कर्णीं आली ॥
म्हणती पहा दर्शन नव्हाळी । जाईल पांगुळीक तात्काळ ॥ १५७ ॥
परी हा पायांचा लंगडेपणा । दीक्षित न मानीत उणेपणा ॥
म्हणत लंगडेपणा तो मना । चालवा म्हणाले साईस ॥ १५८ ॥
रचा । कधिर पां । हातां । समुदाय नरदेहाचा सांगाटा ॥
हा क्षणभंगुर संसार गाडा । पाय लंगडा गाडा का ॥ १५९ ॥
एकाणामसं नक मन । पहिना नांदेडचा नागास दान ॥
दीक्षितांस तें पुण्यपावन । साई दर्शन आरंभा ॥ १६० ॥

मग ते पुढें त्याचवर्षीं । पुनश्च गेले डिसेंबर मासीं ॥
शिरडीस श्रीच्या पुनर्दर्शनासी । व्हावें रहिवासी मन झालें ॥१६१॥
काढावे पंचवीस शेअर । बांधावें एक पत्र्याचें छपर ॥
यात्रेकरूंस ही सोइस्कर । प्रथम विचार हा स्फुरला ॥ १६२ ॥
पुढें बांधावा एक वाडा । ऐसा जाहला मनाचा धडा ॥
पुढील वर्षींच मुहूर्त मेढा ॥ निक्षेप दगडासी पायाच्या ॥ १६३ ॥
नऊ डिसेंबर तो दिन । बाबांचे घेतलें अनुमोदन ॥
तोच सुमुहर्त मानून । पायाबंधनसारिलें ॥ १६४ ॥
बोलावून ही येणार नव्हे । ते दीक्षितांचे बंधूहीं तेथें ॥
ते दिवशीं त्याच मुहूर्तें । आलेही होते आधींच ॥ १६५ ॥
श्रीयुत दादासाहेब खापर्डे । पूर्वींच आले होते सडे ॥
परवानगी मागतां बाबांकडे । कोण सांकडे तयांला ॥ १६६ ॥
परी खापर्ड्यांतें घरीं जावया । दीक्षितांतें पाया घालावया ॥
जाहल्या या आज्ञा उभयां । दहा डिसेंबर या दिनीं ॥ १६७ ॥
आणखीं या दिवसाची महती । चावडीची जी शेजारती ॥
तीही याच दिवसापासून करिती । परम भक्ति प्रीतियुत ॥ १६८ ॥
पुढें सन एकूणीससें अकरा । रामनवमीचा मुहूर्त बरा ॥
साधूनि गृह प्रवेश संस्कारा । विधि पुरःसर सारिलें ॥ १६९ ॥
पुढें श्रीमंत बुट्टींचा इमला । अलोट पैका खर्चा घातला ॥
देहही बाबांचा तेथ विसवला । पैका लागला सार्थकीं ॥ १७० ॥
वाडे झाले तीन आतां । जेथें पूर्वीं एकही नव्हता ॥
आरंभीं साठ्यांचे वाड्याची उपयुक्तता । फारचि समस्तां जाहली१७१

१ घरीं परत जावयास बाबांची आज्ञा.

आणिक एक या वाड्याची महती । आरंभीं याच स्थानावरतीं ॥
फुलझाडांची बाग होती । निर्मिली निज हस्तीं बाबांनीं ॥ १७२ ॥
बागेची या अल्प कथा । पुढील अध्यायीं येईल वर्णितां ॥
हेमाड साई चरणीं माथा । ठेवी श्रोतां समवेत ॥ १७३ ॥
वामन तात्या घडे पुरवित । साई समर्थ पाणी शिंपत ॥
उखर जागीं बाग उठवित । पुढें तें गुप्त जाहलें ॥ १७४ ॥
पुढें औरंगाबादेपाशीं । चांद पाटील भेटले त्यांसीं ॥
लग्नाचिया वऱ्हाडासी । आले शिरडीसि मागुते ॥ १७५ ॥
पुढें देवा दासाची भेट । पडली जानकी दासाची गांठ ॥
गंगागीरांची दृष्टादृष्ट । मिळालें त्रिकुट शिरडींत ॥ १७६ ॥
मोहिद्दीना सवें कुस्ती । तेथून मग पशिटी वस्ती ॥
जडली डेंगळ्या लागी प्रीती । भक्त भोंवती मिळाले ॥ १७७ ॥
या सर्व कथा वार्तांचें कथन । होईल पुढील अध्यायीं श्रवण ॥
आतां हेमाड साईसी शरण । घालीत लोटांगण अनन्य ॥ १७८ ॥

इति श्री संत सज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
साई समर्थ सच्चरिते । साई समर्थावतरणं
नाम चतुर्थाध्यायः

श्री सद्गुरु साई नाथार्पणमस्तु शुभंभवतु ॥